## —: प्रेसनोट :—

दिनांक ०७/१०/२०२६

**धोकादायक ज्वलनशील हायड्रोक्लोरिक ॲसिडची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या इसमावर कारवाई**

दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे १९.०० वा., दहिसर पूर्व, रत्ननगर परिसरातील घनश्याम दुबे पार्किंग, सेंट झेवियर्स शाळेजवळ दहिसर पोलीस पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयास्पद Ford Endeavour मोटार वाहन क्र. MH-05-ED-8887 ची तपासणी करण्यात आली.

सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ज्वलनशील व धोकादायक हायड्रोक्लोरिक ॲसिड एकूण ५२.५ लिटर, विविध क्षमतेच्या एकूण १० प्लास्टिक कॅनमध्ये भरून ठेवलेले आढळून आले.

सदर वाहनामध्ये उपस्थित असलेल्या अजय जितनारायण सिंग, वय ४९ वर्षे, रा. अंबावाडी, दहिसर पूर्व, मुंबई याच्याकडे सदर धोकादायक रासायनिक पदार्थाची वाहतूक अथवा विक्री करण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही वैध परवाना, परवानगी किंवा अधिकृत कागदपत्रे नसल्याचे तपासात निष्पन्न झाले.

हायड्रोक्लोरिक ॲसिडसारख्या धोकादायक रासायनिक पदार्थाची आवश्यक सुरक्षा व कायदेशीर परवानगीशिवाय सार्वजनिक ठिकाणी वाहनातून वाहतूक करणे हे नागरिकांच्या जीवितास, आरोग्यास व सार्वजनिक सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण करणारे असल्याने सदर इसमाविरुद्ध दहिसर पोलीस ठाणे गु.र.क्र. १२८८/२०२६, कलम २८७ भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि कावळे करीत आहेत.

या कारवाईदरम्यान ५२.५ लिटर हायड्रोक्लोरिक ॲसिड तसेच त्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले Ford Endeavour वाहन पंचनाम्याने जप्त करण्यात आले असून, जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर व वैज्ञानिक तपासणीसाठी सुरक्षित ताब्यात घेण्यात आला आहे.

**इसमाचे नाव व पत्ता—**

अजय जितनारायण सिंग, वय ४९ वर्षे, धंदा—व्यवसाय, रा. रूम नं. ०२, जितनारायण सिंग चाळ, रहीमबाग, अंबावाडी, दहिसर पूर्व, मुंबई, ( सदर आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५(३) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. )

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेनभारती, मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), मुंबई, श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. शशिकुमार मीना व मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ—०३, मुंबई श्री. गजानन राजमाने यांच्या मार्गदर्शना खाली तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, मुंबई श्री. जयराज रणवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दहिसर पोलीस ठाणे, मुंबई, श्री सर्जेराव पाटील यांच्या देखरेखीखाली दहिसर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र दहिफळे, सहायक पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कावळे, पोहक्र ०४००८०/काकाड, पोहक्र ०१०१०६/वऱ्हाडी, पोहक्र ०८०५५९/सांगळे, पोहक्र ०६१६१२/भाट, पोशिक्र ०९३५८२/सकपाळ, यांनी पार पाडली आहे.

........००........

Scanned with CamScanner